क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२ दिनांक ३० / १२ / २००९

विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचाराकरिता अग्रीम आणि वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मंजुर करण्याच्या अधिकारांबाबत.

संदर्भ : १) स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६
३) सा.आ. क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३.

.....

कामावर असताना कर्मचाऱ्यास अपघात झाल्यास त्यावर तात्काळ वैद्यकीय उपचार सुरू करता यावेत म्हणून स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८ अन्वये तात्पुरती अग्रीम रक्कम मंजुर करण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच सदर उपचारापोटी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मंजुर करण्याबाबतचे अधिकार प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ अन्वये सुधारित करण्यात आलेले आहेत.

२. वैद्यकीय उपचारापोटी देण्यात आलेली अग्रीम रक्कम तसेच होणाऱ्या खर्चाचे विश्लेषण करून अशा प्रकरणांना मंजुरी देण्याकरिता प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. यास अनुसरून आता व्यवस्थापकीय संचालक यांनी कार्यकारी संचालक (मासं), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना अग्रीम मंजुर करण्याकरिता पुर्वी प्रदान करण्यात आलेले अधिकार आता खालील प्रमाणे सुधारित करण्यास मंजुरी दिलेली आहे.

| | सध्याची तरतूद | | सुधारित तरतूद | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | क्षेत्रिय/सांघिक कार्यालयातील सक्षम अधिकारी | अग्रीम रक्कम | क्षेत्रिय/सांघिक कार्यालयातील सक्षम अधिकारी | अग्रीम रक्कम |
| १ | कार्यकारी अभियंता | रु.१०,०००/- | कार्यकारी अभियंता | रु.१०,०००/- |
| २ | अधीक्षक अभियंता | रु.१५,०००/- | अधीक्षक अभियंता | रु.१५,०००/- |
| ३ | मुख्य अभियंता | रु.२०,०००/- | मुख्य अभियंता | रु.२०,०००/- |
| ४ | संचालक (वित्त) | पूर्ण अधिकार | संचालक (वित्त) | रु.७,००,०००/- पर्यंत |
| ५ | व्यवस्थापकीय संचालक | -- | व्यवस्थापकीय संचालक | रु.७,००,०००/- च्या पेक्षा अधिक रक्कमेसाठी |

३. तसेच कामावर असताना अपघात झाल्यास उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती मंजुर करण्यासाठी असलेले मंजुरीचे अधिकार खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामावर असताना अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यासाठीची रक्कम | सुधारित प्रदान केलेल्या अधिकारानुसार सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| १. | रु.२०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी रकमेची प्रकरणे | संबंधित मंडलाचे अधीक्षक अभियंता - सहाय्यक व्यवस्थापक (क) व सहाय्यक व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांच्याशी विचार विनिमय करुन. |
| २. | रु.२०,००१ ते ३०,०००/- पर्यंतच्या रकमेची प्रकरणे | संबंधित परिमंडळाचे मुख्य अभियंता - व्यवस्थापक (क) व उप व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांच्याशी विचार विनिमय करुन. |
| ३. | रु.३०,००१/- ते रु.७,००,०००/- पर्यंतच्या रकमेची प्रकरणे | सबंधित कार्यकारी संचालक / संचालक (संचलन) / संचालक (वित्त)/ |
| ४. | रु.७,००,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची प्रकरणे | व्यवस्थापकीय संचालक हे संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून |

**टीप** :- रु,७,००,०००/- च्या वरील रकमेच्या प्रतिपुर्ती बाबतच्या प्रकरणात वैद्यकीय सल्लागार व संबंधित परिमंडळातील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व्यक्तीश: प्रकरणांचा अभ्यास करून त्यांनी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

४. अपघात झालेल्या कर्मचाऱ्यास कंपनीच्या मान्यताप्राप्त रूग्णालयाव्यतिरिक्त इतर रूग्णालयामध्ये उपचार करण्यासाठी तातडीने दाखल केले असल्यास अशा कर्मचाऱ्यास तीन दिवसाच्या कालावधीत कंपनीने मान्यता दिलेल्या रूग्णालयात दाखल करण्यात यावे. तसेच रूग्णालयात दाखल करताना प्रशासकीय परिपत्रक क्र.३१ दि.२९.०३.२००६ नुसार राहण्याच्या खोलीबाबत केलेल्या वर्गीकरणाबाबतच्या तरतुदींचे पालन करावे.

५. स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ मध्ये तद्नुषंगिक बदल करण्यात येत आहे.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

७. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

*D:\O&M\Hospitals\Adm.Circular - Medical.doc*
*16/12/2009*